


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : ७७४. वा शुक्रवार दि. १७ मे २०२४ पृष्ठ ८ किंमत ३रुपये

# सा.बां (विद्युत) विभागाच्या कछुआ छाप अधिकाऱ्यांवर कारवाई कधी

## आरओ फिल्टर कामात उप अभियंता गौरकर यांच्याकडून अक्षम्य दिरंगाई

पोस्टमार्टम ८६

**शासकीय आदेश देऊनही सा.बा.उपअभियंता विद्युत विभाग व्ही.एन.गौरकर मुळे रखरखत्या उन्हाळ्यात शुद्ध पिण्याच्या पाण्यापासून रुग्ण व नातेवाईक वंचित...**

जनसंचलन/बुलढाणा

सरकारी काम अन् सहा महिने थांब अशी आपल्याकडे सरकारी कामाबाबत म्हण आहे. काही विभाग आणि त्या विभागातील कासवाच्या गतीने काम करणारे कछुआ छाप अधिकारी ही म्हण तंतोतंत खरे ठरवतात. शासनाचा गलेलठ्ठ पगार घेऊन अत्यंत कूर्मगतीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई होणे गरजेचे आहे. यामध्ये सर्वांत महत्वाचे नाव आहे ते म्हणजे सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाचे उपअभियंता व्ही. एन. गौरकर यांचे.जिल्हा सामान्य रुग्णालय हे शहर तसेच जिल्ह्यातील सामाजिक आरोग्य संवर्धनाचे एक महत्वाचे सरकारी कार्यालय. बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात दररोज शेकडो रुग्ण व त्यांचे नातेवाईक येत असतात. या सर्व नागरिकांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणे गरजेचे असल्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्या तेंव्हा लक्षात आले, जेंव्हा त्यांनी जिल्हा रुग्णालयात प्रत्यक्ष येऊन येथील व्यवस्थेची पाहणी केली होती.त्या वेळी जिल्हा शल्यचिकित्सकांनीही शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना अवगत केले. ही समस्या जाणून घेत जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी स्वतः पुढाकार घेऊन जिल्हा नियोजन व विकास समितीच्या बैठकीत ३४ लाख रुपयांचे एक आरओ फिल्टर बसवण्यासाठी निधी मंजूर केला. खरे तर हे विकासकाम फार काही किचकट किंवा फार काही तांत्रिक अशा स्वरूपाचे नव्हते. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या बरहुकूम तात्काळ यासंदर्भात कारवाई होणे गरजेचे होते. मात्र, लवकरात लवकर काम पूर्ण करणे यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग मुळातच परिचित नाही. कधीतरी, केंव्हातरी फुरसत मिळाली तेंव्हा काम करू, या उक्तीने सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाचे काही अधिकारी व कर्मचारी काम करीत असतात. जिल्हाधिकाऱ्यांनी दि. २७ ऑक्टोबर २०२३ रोजीच ३४ लाख ९७ हजार रुपये खर्चून एक आरओ फिल्टर बसवण्यास मंजूरी दिली. यासंदर्भात उपअभियंता गौरकर यांना वेळोवेळी सूचना देखील केल्या. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर तात्काळ यासंदर्भात कारवाई होणे गरजेचे होते. परंतु तसे झाल्याचे कुठेही दिसून येत नाही. कारण आज तब्बल साडेसहा महीने उलटून गेले, पावसाळा जवळ आला तरी अद्यापही हे काम पूर्ण झालेले नाही. दरम्यान, कडक उन्हाळ्याचे मार्च, एप्रिल महीने येऊन गेले. मे महिन्यात तर उन्हाने अगदीच कहर केलेला आहे. या संपूर्ण कडक उन्हाळ्याच्या महिन्यांमध्ये जिल्हा रुग्णालयात येणारे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना शुद्ध आणि थंड पाणी पिण्याची कोणतीही व्यवस्था नव्हती. पर्यायाने या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांचे प्रचंड हाल झाले. उपअभियंता व्ही. एन. गौरकर यांनी या कामात जी मोठी दिरंगाई केली, त्यातून त्यांचा कोडगेपणा स्पष्टपणे दिसून येतो. गौरकर हे असे अधिकारी आहेत ज्यांना ना एकीकडे आपल्याच वरिष्ठांच्या आदेशाची किंमत आहे ना सर्वसामान्य जनतेला होणाऱ्या त्रासाची. शासनाचा गलेलठ्ठ पगार उचलायचा आणि कामाची कोणतीच जबाबदारी घ्यायची नाही, असा प्रकार गौरकर यांनी केला आहे. जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी या प्रकरणी तात्काळ दखल घेऊन उपअभियंता व्ही. एन. गौरकर यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे.




आपल्याच अधिकाऱ्यांच्या आदेशाला अशाप्रकारे केराची टोपली दाखवणाऱ्या गौरकर यांच्यासारख्या अधिकाऱ्यांमुळेच सरकारी यंत्रणा बदनाम झालेली आहे. सर्वसामान्य नागरिकांना त्रास अशाच ढिसाळ अधिकाऱ्यांकडून होत असतो. जोपर्यंत गौरकर यांच्यावर कारवाई केली जात नाही, तोपर्यंत सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने याचा पाठपुरावा करीत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# लहान मुलांचा वाद सुरू असतांना त्याठिकाणी गेले असता संबंधितांना केली मारहाण

जनसंचलन/मलकापूर

लहान मुलांचा वाद सुरू असतांना त्याठिकाणी गेले असता संबंधितांना मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरूध्द मलकापूर शहर पो. स्टे. ला विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. याबाबतची माहिती अशी की, सै. अजीम सै. नुरा अहेमदपुरा पारपेठ यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, शेख आबीद शेख गफ्फार, शेख इमरान शेख लुकमान या परिवारासह राहत असून शेख आबीद माझा भाचा असून तो कुरेशीनगर पारपेठ येथे राहता व शेख इमरान याला मी ओळखतो. १४ मे च्या रात्री १० वाजता मला माहिती पडले की, मोहनपुरा मलकापूर येथे आपसात काही मुलांचे वाद सुरू आहे. म्हणून मी त्याठिकाणी गेलो असता माझा भाचा आबीद शेख याचे डोक्यातून रक्त निघून तो जखमी झाला. त्याला विचारले असता कोणी मारले तर त्याने सांगितले की, मी कामावरून घरी येत असतांना मोहनपुरा येथे मुलांचे वाद सुरू होते. त्यामधील शेख अहसान इमरान शेख रा. मोहनपुरा याने माझ्या जवळ येऊन जमीनीवरील मोठा दगड उचलून माझ्या डोक्यात मारला. तसेच अहसान याचे सोबत असणारे शेख मेहमुद शेख रशीद याने हातातील लोखंडी पाईपने, शेख आबीद याचे डावे दंडावर मारहाण केली. शेख अनिस शेख शरीफ याने मला पकडून ठेवले. शेख अकरम शेख शहीद याने सुध्दा मला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच माझा मित्र शेख इमरान शेख लुकमान हा भांडण सोडविण्यास आला असता त्याला सुध्दा कपाळावर मारहाण करून जखमी केले. दिलेल्या तक्रारीवरून आरोपी शेख अहसान इमरान शेख, शेख मेहमुद शेख रशीद, शेख अनिस शेख शरीफ, शेख अकरम शेख शहीद या चार जणांविरूध्द गुन्हा क्र. ०२४२/२४ अन्वये कलम ३२६, ३२३, ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक अनिल गोपाळ यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

# शेतकरी पुत्राने कर्जापाई गळफास घेऊन केली आत्महत्या

जनसंचलन/ चिखली



तालुक्यातील मौजे अंत्री खेडेकर येथील संजय नरहरी खेडेकर वय ३३ वर्ष यांनी गट नंबर ९९२ मेरा बुद्रुक शिवारात नरहारी खेडेकर यांच्या शेतामध्ये लिंबाच्या झाडाला दुरीच्या साह्याने गळफास घेऊन त्यांनी संपवली आहे संजय नरहरी खेडेकर यांच्यावर काही शासकीय बँक खाजगी पतसंस्था तसेच बचत गट व फायनान्स यांचे कर्ज असल्यामुळे त्यांनी कर्जाच्या बोजा पाई कर्जाला कंटाळून आज दिनांक १६ मे २०२४ रोजी १२ वाजता शेतामध्ये जाऊन स्वतःची जीवन यात्रा संपली आहे त्यांच्या पश्चात आई-वडील भाऊ बहीण एक मुलगा एक मुलगी पत्नी असा बराच आपत परिवार आहे सदर घटनेची माहिती अंढेरा पोलिस स्टेशन चे ठाणेदार विकास पाटील यांना मिळताच त्यांनी मेरा अंत्री खेडेकर चे बीट जमदार उगले यांनी घटनास्थळी येवुन पंचनामा केला तसेच महसूल विभागाचे तलाठी लखन जाधव व कोतवाल महेश मोरे यांनी घटनास्थळी येऊन सदर घटनेची माहिती चिखली तालुक्याचे तहसीलदार श्री काकडे साहेब यांना दिली आहे

# अंत्री येथील २९ वर्षीय युवक बेपत्ता




**जनसंचलन/ मोताळा**

तालुक्यातील अंत्री येथून २९ वर्षीय युवक बेपत्ता झाल्याची घटना १३ मे रोजी उघडकीस आली. याप्रकरणी बोराखेडी पोलिसांनी मिसींग दाखल केली आहे. अंत्री येथील अमोल दिलीप बोदडे यांनी १४ मे रोजी बोराखेडी पोस्टे. ला दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, त्यांचा लहान भाऊ गोपाल दिलीप बोदडे हा १३ मे ला सकाळी ७ वाजेच्या सुमारास बाहेर कामाला जातो, असे सांगून घरुन निघून गेला. तो घरी परत न आल्याने त्यांचा परिसरात व नातेवाईकांकडे शोध घेतला असता तो मिळून आला नाही, अशा फिर्यादीवरुन पोलिसांनी मिसींग दाखल केली आहे. हरविलेल्या युवकाचा रंग सावळा, उंची १६८ से. मी. आहे. दाढी वाढलेली, अंगात पांढऱ्या रंगाचा शर्ट व जिन्स पँट घातलेला असून उजव्या हातावर लव व इंग्रजीत जी गोंधलेले आहे. पुढील तपास पोना. अमोल खराडे हे करीत आहे.

# जवाहर नवोदय विद्यालय शेगाव येथील दहावीच्या सीबीएससी परीक्षेत समीक्षा धुरंधर मुलीतून सर्वप्रथम तर विद्यालयातून दुसरी...

**जनसंचलन/ चिखली**

किन्ही सवडद येथील कु. समीक्षा सहदेव धुरंदर ही नुकत्याच लागलेल्या केन्द्रीय उच्च माध्यमिक शिक्षा बोर्ड (सीबीएसई) परीक्षा २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १० वीच्या परीक्षेत जवाहर नवोदय विद्यालय येथील मुलींमधून तीने प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर त्याच विद्यालयातून ती दुसऱ्या क्रमांक



वर आहे. ९४.६०%टक्केमार्क घेऊन विज्ञान आणि गणित या विषयात गुण घेऊन तिने यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलीगी जिद्द,चिकाटी,मेहनत ,सातत्य या गुणाचा वापर करून चांगल्या प्रकारे यश संपादन करू शकतात हे तिने तिच्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे. तिच्या यशामुळे विविध स्तरातून तिच्यावर कौतुक व अभिनंदन याचा वर्षाव होत आहे.

# नगराध्यक्ष, नायब तहसीलदारसह ६ पदाधिकारी व कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

**वृत्तसंस्था/गोंदिया**

गोरेगावचे तहसीलदार, नायब तह-सीलादर व संगणक ऑपरेटर असे तिघे एसीबीच्या जाळ्यात अडकले. या कारवाईला आठवडा लोटला नाही की, सडक अर्जुनी नगर पंचायतीमध्ये सुरू असेलेल्या भ्रष्टाचाराला लाचलुचपत विभागाने उखरून काढले आहे. आज १४ मे रोजी निविदा रकमेवर १५ टक्के लाच मागणार्या नगराध्यक्ष, नायब तह-सीलदार तथा प्रभारी मुख्याधिकारी, बांधकाम सभापती, नगरसेवक व दोन खाजगी व्यक्ती असे एकूण ६ जणांना जाळ्यात अडकविले. या सहाही आरोपींविरुद्ध डुग्गीपार पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींमध्ये नगराध्यक्ष तेजराम मडावी, नायब तहसीलदार शरद हलमारे, बांधकाम सभापती अश्लेश अंबादे, नगर-सेवक महेंद्र वंजारी व खाजगी इसम तथा नगरसेविकेचा पती जुबेर अलीम शेख ( राजु शेख) व शुभम येरणे यांचा समावेश आहे. तक्रारदार कंत्राटदार असून त्याला सडक अर्जुनी नगर पंचायत अंतर्गत वैशिष्ट्पुर्ण कामासाठी प्राप्त विशेष अनुदान लेखाशिर्षका अंतर्गत २ नाली बांधकामाच्या निविदा मंजुर झाल्या. दरम्यान सर्व अटी-शर्तीची पुर्तता करून तक्रारकर्त्याने कार्यारंभाचे आदेश मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. परंतु नगराध्यक्ष किशर मडावी यांनी निवेदा रकमेची १५ टक्के या प्रमाणे १ लाख ८२ हजार रुपयाची लाच मागितली. तक्रारकर्त्याच्या तक्रारीवरून लाचल-चपत विभागाने सापळा रचला दरम्यान



आरोपी प्रभारी मुख्याधिकारी शरद हलमारे, सभापती अश्लेश अंबादे, नगरसेवक महेंद्र वंजारी, नगरसेविकेचा पती जुबेर अलीम शेख व शुभम येरणे यांच्या माध्यमातून नगराध्यक्ष लाच मागत असल्याचे निष्पन्न झाले. त्याच प्रमाणे खाजगी इसम शुभम येरणे याच्या माध्यमातून लाच स्विकारण्यात आली. या प्रकरणी सर्व सहा आरोपीविरुद्ध डुग्गीपार पोलिसात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# भरदिवसा चोरट्याने केल्या आठ बकऱ्या लंपास...

**जनसंचलन/बुलढाणा**




भरदिवसा शहरातील इंदिरानगरमधून एका वाहनाद्वारे ८ बकऱ्यांची चोरी करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तींविरोधात बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंदिरानगरमधील सुनंदा चव्हाण यांनी याप्रकरणी पोलिसात तक्रार दिली. १४ मे रोजी सकाळी १० ते ११ वाजेदरम्यान मोकळ्या जागेत बकऱ्या चारत होती. दरम्यान, पाणी पिण्यासाठी महिला घरी आली. तेवढ्या तीन ते चार अज्ञात व्यक्तींनी एका वाहनात ८ बकऱ्यांना घेऊन पलायन केले. प्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास बुलडाणा शहर पोलिस करत आहेत.

# भरधाव बसने पायी जाणाऱ्यास उडविले

**जनसंचलन/ डोणगांव**




अंजनी बुद्रुक येथील अनिल चंदनशिव हे रात्री बसस्थानकावरुण पाई घरी जात होते घरी जात असताना भरधाव एसटी बसने त्यांना जबर धडक दिली त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला सविस्तर वृत्त अशे की अंजनी बुद्रुक येथील अनिल चंदनशिव(वय ४५)हे रात्री पायी जात असताना भरधाव बसने उडविले यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना १४ मे रोजी रात्री घडली. अनिल शिवाजी चंदनशीव रा अंजनी बु. असे मृतकाचे नाव आहे. अंजनी बु. येथील अनिल चंदनशीव हे गावातील बसस्थानकावर १४ मे रोजी रात्री पायी जात होते. दरम्यान बस क्रमांक एमएच २० बीएल २८८१ च्या चालकाने बस भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून अनिल चंदनशीव यांना धडक दिली. यामध्ये ते गंभीर जखमी झाले होते गावातील नागरिकांनी त्यांच्याकडे धाव घेऊन त्यांना त्वरित उचलले पण त्यावेळेस त्यांचा मृत्यू झालेला होता याप्रकरणी विनोद गोविंदा चंदनशिव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी बसच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याचा पुढील तपास ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका संजय घिके हे करीत आहेत

# बुलढाणेकरांनो सावधान जिल्ह्याच्या मुख्यालयी पाणी पुरवठा करणाऱ्या धरणात फक्त १५ टक्के जलसाठा

## शहराला ७ ते ८ दिवसानंतर पाणी पुरवठा...

**जनसंचलन/बुलढाणा**

मागील काळात पाऊस कमी झाल्याने जिल्ह्यातील प्रकल्पात अत्यल्प जलसाठा शिल्लक राहिला आहे.. तसेच जिल्ह्याच मुख्यालंय असलेल्या बुलढाणा शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या येळगाव धरणात आता केवळ १५ टक्के जलसाठा असल्याने बुलढाणेकरांना पाणी टंचाई ला सामोरे जावे लागणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे अगोदरच इयात शेकडो गावात भिषण पाणी टंचाई असल्याने ठिकठिकाणी टँकर ने पाणी पुरवठा केलता जात आहे आता भीषणता वाढली आहेजिल्हाधिकारी हे या परिस्थितावर बारकाईने लक्ष ठेऊन आहेत पर्यायी व्यवस्था जिल्हा प्रशासनाच्या वतीने केल्या जात आहे.. बुलढाणा शहरात सध्या ७ दिवसाने एकदा पाणी पुरवठा केल्या जात आहे.. पावस-ळा वेळेवर सुरु झाला तर टंचाई चे संकट दूर होईल मात्र पाऊस वेळेवर झाला नाही तर पाणी टंचाई ची तीव्रता वाढणार एवढे मात्र नक्की. त्यामुळे पाण्याचा वापर जपून करावे विनाकारण पाण्याचा गैरवापर करू नये असे आव्हान सुध्दा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे



The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# बदनामीची धमकी देत त्याने केला विवाहितेवर अत्याचार...

## आरोपी विरोधात बलात्कारासह ॲट्रॉसिटी चा गुन्हा दाखल

**जनसंचलन/बुलढाणा**

दिवसेंदिवस महिलांवर अत्याचार होणाऱ्या घटना वाढत चाललेल्या आहे. या गोष्टीला कुठेतरी आळा बसणे गरजेचे आहे. एका खाजगी रुग्णालयात कार्यरत असलेल्या महिलेवर अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. लगतच्या रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका कर्मचार्याने बदनामीची धमकी देत अत्याचार केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी विरोधात बलात्कारासह ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सदर घटनेचा पुढील तपास एसडीपीओ सुधीर पाटील हे करीत आहे. सविस्तर वृत्त असे पीडित महिलेला तिच्या पतीने एक खाजगी रुग्णालयामध्ये परिचारिकेची नोकरी लावून दिली ज्या रुग्णालयात पीडित महिला कार्यरत होती त्याच्या बाजूलाच एक दुसरे रुग्णालय होते तेथे विशाल बोराडे हा कार्यरत होता त्यामुळे



आरोपीचे पिढी तिच्या घरी ये जा सुरू झाली दरम्यान आरोपी विशाल याने बदनामी आणि मुलांना जीवे मारण्याची धमकी देत पीडितेवर अत्याचार केला २०२१ ते २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत हा प्रकार सुरू होता या प्रकाराला कंटाळलेल्या पिढीतेने अखेर विशाल बोराडे विरोधात पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणात आरोपी विरोधात बलात्कारासह ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे सदर घटनेचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी हे करीत आहे.

# निमगाव वायाळ येथील किराणा दुकानाला आग

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील निमगाव वायाळ येथील ईश्वर किराणा आज तारीख १६ मे रोजी सकाळी आग लागली असून या किराणा दुकानातील लाखो रूपये किंमतीचा किराणा माल आगीच्या भक्ष्यस्थानी पडून जळून खाक झाला असून किराणा दुकानदार जखमी झाल्याची घटना निमगाव वायाळ येथे घडली आहे सदर आग शॉटसर्किटने लागल्याचा प्राथमिक अंदाज आहेत या अग्नीतांडवात दुकानातील साहित्य व घरगुती सामानाचे जवळपास दोन लाखांपर्यंत नुकसान झाल्याचा अंदाज आहे दुकानातील विद्युत वितरण वायरमध्ये शॉटसर्किटने ही आग लागल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले या शॉटसर्किटने दुकानातील झोपण्याचे कपड्यांनी पेट घेतल्याने दुकानातून आगीचे लोट बाहेर पडले या वेळी दुकानदार दलसिंग मानसिंग देव्हरे यांच्या कपड्यांनी पेट घेतल्याने ते दुकानाबाहेर पळालयाने गावातील नागरिकानी त्यांच्या अंगावरील आग विझवून त्यांना तात्काळ पुढील उपचारासाठी खाजगी दवाखान्यात भरती करण्यात आले यावेळी उपस्थित नागरिकानी दुकानातील आग विझवण्यासाठी पाण्याचा वापर करून आग आटोक्यात आणली मात्र या आगीच्या भक्ष्यस्थानी किराणा दुकानातील गोडेतेल साखर चिपचे पुडे बिस्किटे व कोल्डड्रिंक्स व फ्रिज जळून खाक झाले आहे तसेच घरगुती सामनामध्ये कांदे व मोठ्या प्रमाणात आंबे जळून खाक झाले आहे सदर घटनेची माहिती मिळताच निमगाव वायाळ चे तलाठी विष्णू थोरात यांनी भेट देऊन झालेल्या नुकसानीचा पंचनामा केला आहे

# सोयाबीन बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक किनगाव राजा येथे संपन्न



**जनसंचलन/सिंदखेडराजा**

मौजे किनगाव राजा येथे सोयाबीन बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक घेण्यात आले. सदर प्रात्यक्षिकामध्ये तालुका कृषी अधिकारी पांचाळ साहेब यांनी बीज प्रक्रियेचे महत्त्व पटवून दिले. शेतकऱ्यांनी अगोदर रासायनिक कीटकनाशक आणि बुरशीनाशकाची बीज प्रक्रिया करावी पेरणीच्या दोन तास अगोदर जीवाणू संघ याची बीज प्रक्रिया करावी अशी त्यांनी माहिती दिली. मंडळ कृषी अधिकारी जगताप साहेब यांनी शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया कशी करावी याबद्दल माहिती दिली. कृषी पर्यवेक्षक पी.जे. कांगणे साहेब यांनी बुरशीजन्य रोग व खोडमाशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी बीज प्रक्रिया करणे आवश्यक असल्याचे सांगून सर्व शेतकरी बांधवांनी बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी असे आवाहन त्यांनी केले. श्री बगाडे साहेब कृषी सहायक यांनी सदर कार्यक्रमाचे नियोजन केले . सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री कांगणे साहेब यांनी केले व श्री बगाडे साहेब यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमासाठी आकाश शेळके ,सुरेश सानप, बाबुराव साळवे, संतोष हरकळ, पंढरी कुठे, सय्यद मूर्तिजा अली, श्याम महाजन,सादिक सय्यद सलाउद्दीन शेख, रामा गिराम, राजू काकड, किशोर हरकळ इत्यादी शेतकरी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# संदीपदादा शेळकेंच्या मार्गदर्शनात गजानन येवले उर्फ नानांनी घेतला तंटामुक्तीचा वसा!

## ईसोलीकर म्हणतात असा तंटामुक्ती अध्यक्ष होणे नाही..

**जनसंचलन/चिखली**

गाव हेच माझे घर आणि गावातील प्रत्येक नागरिक माझ्या घरातील सदस्य अशी भूमिका तंटामुक्ती अध्यक्ष गजानन येवले उर्फ नाना यांनी घेतली आहे. वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीपदादा शेळके यांच्या मार्गदर्शनात नानांनी आपल्या आदर्श कार्यपद्धतीने सर्वांना आपलेसे केले आहे. शेतीचा असो की घरगुती वाद, मुलींच्या सासरच्या कटकटी असो की लोकांच्या पोलीस स्टेशनच्या भानगडी नानांनी स्वतः लक्ष घालून मार्गी लावल्या. त्यामुळेच असा तंटामुक्ती अध्यक्ष होणे नाही अशा भावना ईसोलीकर बोलून दाखवतात. गतवर्षी २६ जानेवारीला ईसोली ग्रामपंचायतने तंटामुक्ती अध्यक्ष पदासाठी ग्रामसभा आयोजित केली होती. ग्रामसभेला उपस्थित असंख्य नागरिक अध्यक्ष होण्यासाठी इच्छुक होते. जवळपास साडेतीनशे ते चारशे ग्रामस्थ प्रत्यक्ष ग्रामसभेला हजर होते. परंतु ज्यावेळी इसोलीमधून गजानन येवले उर्फ नाना यांना तंटामुक्ती अध्यक्ष करायचे अशी विनंती सरपंचांनी केली त्यावेळी कुणीच विरोध केला नाही. सर्वांनी एकमताने होकार दिला. गजूभाऊच्या विरोधात कुणीच उभं राहायचं नाही ही भावना घेऊन नानांना बिनविरोध निवडून आणले.



गावकऱ्यांचा विश्वास सार्थ ठरवत नानांनी तंटामुक्तीचा ध्यास घेतला. गजाननभाऊ उर्फ नाना असे पहिले तंटामुक्ती अध्यक्ष आहेत की, एक फोन लावला तर पाच मिनिटात हजर होतात. जिथे वाद आहे, जिथे तंटा आहे तिथे उपस्थित राहतात. गाव माझे घर आहे आणि या गावातील प्रत्येक व्यक्ती माझ्या घरातील सदस्य आहे, असे ते मानतात. कोणताही वाद सोडतांना अगदी आपल्या घरातल्या माणसाचा वाद सोडवावा तसे लक्ष घालतात. कधी शेताच्या धुऱ्याचा रस्ता असेल, कोणाच्या सोयरीकीचा वाद असेल नानांनी मार्गी लावला. असंख्य वेळा असे होते की, काही कारणाने सोयरीक तुटायची वेळ येते. तेंव्हा नानांनी मुलीकडच्या मंडळीची बाजू घेऊन समझोता घडवला. तंटामुक्ती अध्यक्ष म्हटलं की राजकीय पद आलंच. परंतु त्यांनी कधीच राजकारणासाठी आणि दोन मतासाठी अयोग्य न्याय दिला नाही. भांडण तंटा होऊन माहेरी गेलेल्या अनेक मुलींना त्यांनी सासरी आणले. आज त्यांचे संसार गुण्यागोविंदाने सुरु आहेत. गजाननभाऊंनी कधी जातीपातीचा विचार केला नाही. ईसोलीत १९ पोटजातीचे लोक राहतात. परंतु हे गाव माझं घर आहे आणि गावातील प्रत्येक व्यक्ती हा माझ्या घरातील सदस्य आहे, या भावनेने गजाननभाऊ येवले काम करतात. अनेकदा पोलीस स्टेशनला गेलेले रिपोर्ट सुद्धा त्यांनी स्वतः पोलीस स्टेशनला जाऊन आपसात केले. शेकडोच्या प्रमाणात होणाऱ्या पोलीस तक्रारी अगदी बोटावर मोजण्या एवढ्यावर आणल्या. नानांची काम करण्याची पद्धत आणि त्यांचा स्वभाव यामुळे असा तंटामुक्ती अध्यक्ष होणे नाही असे गावकरी म्हणतात....

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नरेंद्र मोदींच्या रोड शोनंतर आता इंडिया आघाडीची १७ मे रोजी मुंबईत रॅली, अनेक दिग्गज एकत्र येणार

वृत्तसंस्था/मुंबई



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रोड शो आणि रॅलीनंतर आता विरोधी पक्ष इंडिया आघाडीही देशाच्या आर्थिक राजधानी मुंबईत मेगा रॅली काढणार आहे. या रॅलीत विरोधी पक्षांचे अनेक दिग्गज एकत्र येणार आहेत. काँग्रेसकडून मल्लिकार्जुन खर्गे, आम आदमी पार्टीचे अरविंद केजरीवाल, शिवसेनेचे उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे नेते शरद पवार या रॅलीला पोहोचणार आहेत. शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता ही रॅली होणार आहे. मात्र या रॅलीत गांधी कुटुंबातील कोणताही सदस्य सहभागी होणार नाही.तसेच पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव हे इंडिया आघाडीच्या या रॅलीत सहभागी होणार नाहीत. याबाबत महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी सांगितले की, विरोधी आघाडीचे नेतेही १८ मे रोजी मुंबईत संयुक्त पत्रकार परिषद घेणार आहेत. वांद्रे कुर्ला संकुलात (बीकेसी) इंडिया अलायन्सचा मेळावा होणार आहे. शिवसेनेने (युबीटी) १७ मे रोजी शिवाजी पार्क येथे भारत आघाडीच्या मेळाव्यासाठी अर्ज केला होता. जो ने फेटाळला होता.त्याऐवजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला रॅली आयोजित करण्यास परवानगी देण्यात आली. मनसेने भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती आघाडीला पाठिंबा आणि प्रचार करण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही शुक्रवारी दादरच्या छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात सभा होणार आहे. काँग्रेस सत्तेत आल्यास देशातील संपत्ती मुस्लिमांमध्ये वाटून देईल, असे पंतप्रधान मोदींनी आपल्या भाषणात म्हटले होते. याला उत्तर देताना महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी चेन्निथला म्हणाले की, पंतप्रधानपदावर असलेल्या व्यक्तीने अशी भाषा वापरू नये. पण पंतप्रधान मोदींनी गेल्या १० वर्षात काय केले यावर बोलण्यासारखं काहीही नसल्यामुळे ते हिंदू-मुस्लिम, भारत-पाकिस्तान इत्यादींवर भाषणे देत आहेत.

## २८ मे रोजी योग्य निर्णय न घेतल्यास दामोदर हॉलसाठी उपोषणाला बसू-प्रशांत दामले

वृत्तसंस्था/मुंबई




मराठी रंगभूमीची मातृसंस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेकडे परळच्या दामोदर हॉल व सहकारी मनोरंजन मंडळाच्या वादात आता अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने हस्तक्षेप केला आहे!

२८मे परत योग्य पाऊल उचलला नाही तर दामोदर हॉल साठी उपोषणाला बसणार असल्याचा इशारा नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी पत्रकार परिषदेत दिला! सोशल सर्विस लीग संस्थेच्या जागेवर असलेल्या दामोदर हॉल आणि सहकारी मनोरजन मंडळाचे प्रकरण, नोव्हेंबर २०२३ पासून शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर , आ प्रवीण दरेकर तसेच मंत्री मंगल प्रभात यांनी भेट दिल्यानंतर दामोदर हॉलच्या पाडकामाला स्थगिती देण्यात आली होती ! स्थगिती असतानाही सोशल सर्विस लीगने पुन्हा पाडकम सुरू केले सहकारी मनोरंजन मंडळाने मराठी रंगभूमीची मातृसंस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेकडे दाद मागितली यावर नाट्य परिषदेने पत्रकार परिषद बोलवत आपले म्हणणे मांडले यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी ठाम भूमिका मांडली! यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले आणि त्यांच्यासह बाल रंगभूमीच्या अध्यक्षा नीलम शिर्के सामंत यांनीही दामोदर हॉलसाठी आ-पणही उपोषणास बसू असे सांगितले! परिषदेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके, बाल रंगभूमीचे कार्याध्यक्ष राजू तुलालवार परिषदेचे प्रवक्ते व सरचिटणीस अजित भुरे ,सहकारी मनोरंजन मंडळाचे अध्यक्ष प्रमोद तांबे ,मंडळाचे सचिव के राघव कुमार ,ज्येष्ठ अभिनेते उपेंद्र दाते ,निर्माते दिलीप जाधव , अभिनेत्री लावणी नृत्यांगना मेघा घाडगे ,सहकारी मनोरंजन मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते! यावेळी दामोदर नाट्यगृह बचाव आंदोलनामध्ये आंदोलनाच्या सुरुवातीपासून पाठिंबा देणाऱ्या मीडिया असोसिएशन ऑफ इंडियाच्या अध्यक्ष शीतल करदेकर यांनी सांगितले की मराठी कलावंतांना नेहमीच गृहीत धरले जाते आणि मुंबईसारख्या ठिकाणी असलेले दामोदर नाट्यगृह ,तेथील कर्मचाऱ्यांना न्याय मिळणे आवश्यक आहे आणि त्यासाठी आमची संघटना आपल्या सोबत आंदोलनात या प्रकरणाचा सकारात्मक निकाल लागेपर्यंत राहील ! माई संघटनेचे कोषाध्यक्ष चेतन काशीकर यांनीही मराठी नाट्यगृह बद्दल असलेल्या अनास्थेबद्दल आपले मत व्यक्त करत काही प्रश्नही उपस्थित केले!

## दहिद येथे बीजोत्पादन कार्यक्रम


जनसंचलन/बुलढाणा



कृषि संपन्न शेतकरी उत्पादक कंपनीतर्फे दहिद खु. येथे बीजोत्पादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. माजी सरपंच प्रकाश कळवाधे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस पाटील श्री. सुरगडे उपस्थित होते. कलश सीड कंपनीचे रिजनल मॅनेजर अमोल शिंगणे यांनी बीजोत्पादन कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. कृषी पर्यवेक्षक श्री. अंभोरे यांनी सोयाबीन उगवण क्षमता तपासणी प्रात्यक्षिक करून दाखविले. यामध्ये सेंद्रीय अमृत शेतकरी उत्पादक कंपनी बुलढाणा, कृषि संपन्न शेतकरी उत्पादक कंपनी दहिद खु., जिजाऊ शेतकरी उत्पादक कंपनी अंभोडा, गोसंवर्धन शेतकरी उत्पादक कंपनी सोयगाव आदी कंपनीचे शेतकरी सभासद उपस्थित होते. तालुका कृषी अधिकारी ए. टी. सुरडकर यांनी प्रास्तविक केले. गजानन इंगळे यांनी आभार मानले. यावेळी मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहायक उपस्थित होते.

## १९ वर्षीय युवतीचा केला विनयभंग

जनसंचलन/शेगाव



शहरातील माळीपूरा मध्ये एका १९ वर्षीय युवतीचा विनयभंग केल्याची घटना १५ मे रोजी रात्री १२.३० वाजता घडली. याबाबत पिडीत युवतीने शहर पोलिसात फिर्याद दिली की, माझ्या घराचे बांधकाम सुरू असल्याने मी माझ्या आत्याच्या घरी राहते व वडील बाजूला भाड्याची खोली करून जवळच राहतात. माझ्या आत्याचे घरी १५ मे रोजी आत मध्ये एकटी बसलेली होती. माझी आत्या बाजुच्या घरी गेलेली होती. घराचा समोरील दरवाजा लोटलेला होता त्यावेळी अचानक आरोपी रवि गजानन हाडोळे रा. माळीपुरा याने घराचे आत मध्ये प्रवेश करून मी खुर्चीवर बसलेली असतांना माझा उजवा हात पकडुन मला वाईट उददेशाने जवळ ओढून कवठयात पकडून मिठी मारली त्यामुळे मी जोराने आरडा ओरड केली असता त्याने मला दमदाटी करून ओरडू नको असे म्हणून जिवाने मारण्याची धमकी दिली मी परत जोराने ओरडली असता तो घाबरून घरा बाहेर पळून गेला. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून कलम ३५४, ४५२, ५०६ भादवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.